# तुमच्या हेतूकडे लक्ष द्या


प्रिय मित्रहो,

जन्माष्टमीच्या या आनंददायी दिवशी, चेतना आणि उर्जा याविषयीचे माझे काही विचार मी तुम्हाला सांगणार आहे.

बाबूजींच्या मते, जर ऊर्जा वापरली नाही तर काही काळानंतर ती स्वत:ला नष्ट करेल, त्याच वेळी, शास्त्र सांगते की ऊर्जा कधीही नष्ट होऊ शकत नाही, परंतु तिचे रूपांतरण होऊ शकते. याला आपण नाश पावणे किंवा रूपांतरित होणे असे काहीही समजत असलो तरीही, जेव्हा आपण विद्या प्राप्त करून किंवा अविद्या प्राप्त करून ऊर्जा वापरत नाही, तेव्हा त्यापेक्षाही बरेच वाईट घडू शकते – ऊर्जा कुंठित होणे. म्हणूनच, आळशी माणूस असणे चांगले नाही. लोक समजतात की आळशी माणूस काही वाईट करीत नाही, पण कुंठित होणे ही तुम्ही स्वत:साठी करू शकत  असलेली सर्वात वाईट गोष्ट आहे. आळसामुळेही काही प्रमाणात संस्कार निर्माण होतात, कारण स्थूलता जमा होतच असते.

तुमच्यापैकी ज्यानेही जेम्स ॲलनचे ‘ॲज अ मॅन थिंकेथ’ हे पुस्तक वाचले आहे, त्यांना पुढील क्रम आठवेल : विचार कृतीकडे नेतात, ज्यामुळे परिणाम मिळतात, ज्यामुळे चारित्र्य निर्माण होते, ज्यामुळे प्रारब्ध बनते. तरीसुद्धा, विचारांच्या अगोदर काहीतरी आहे – संस्कार. संस्कार आपल्या विचारांना रंग देतात, आपल्या जाणीवेवर आणि आकलनावर आवरणांची भर घालतात.

परंतु संस्कार विचार म्हणून प्रकट होण्यापूर्वी, जर आपण एखादा हेतू मनात बाळगला तर निश्चित झालेला मार्ग बदलण्याची शक्यता निर्माण होते. वस्तुतः, हे कोणत्याही टप्प्यावर होऊ शकते, ज्यामुळे शेवटी आपले प्रारब्ध बदलते. आपल्या सहजमार्गाच्या साधना सर्वतोपरी हेतूचा वापर करण्यावर आधारित आहेत, ज्याला आपण संकल्प म्हणतो, आणि त्यामुळे हस्तक्षेप कोणत्याही स्तरावर होऊ शकतो.



संपूर्ण विश्व हे ऊर्जेने स्पंदित होत असते. आपल्याला प्रकट स्वरूपात दिसणारे स्थूल पदार्थदेखील घनरूप ऊर्जाच असते. एका विजाणू(इलेक्ट्रॉन)मध्ये वाहणारी ऊर्जा ही विशिष्ट दिशेने एका विशिष्ट वेगाने गरगर फिरत असते - त्या गरगर फिरण्याचा कोन ऋण भार निर्माण करतो. जेव्हा ते फिरणे हे विरुद्ध दिशेला जास्त वेगात होते, तेव्हा एका अवअणुकणाची (प्रोटॉनची) निर्मिती होते, ज्याला घन भार असतो. अणूच्या केंद्रामधील ऋण आणि घन भाराच्या गतीच्या जटील ऊर्जा हालचालीमुळे एक प्रभाररहित अवअणुकण (न्यूट्रॉन) तयार होतो, जेव्हा भार एकमेकांचा प्रभाव शून्य करतात आणि वजनाची उत्पत्ती होते. क्वार्क आणि काल्पनिक टॅकिऑन्ससारखे इतर अनेक उपअवआण्विक (सब-सबॅटॉमिक कण) आहेत, आणि याबरोबर ऊर्जेच्या हालचालींचे अनेक भिन्न प्रकार आहेत. या सर्व ऊर्जा आहेत, ज्या वेगवेगळ्या प्रमाणात एकत्र येतात आणि हे प्रकट विश्व निर्माण करतात.

त्याचप्रमाणे, मनातून प्रवाहित होणारी ऊर्जा, त्या व्यक्तीच्या चेतनेद्वारे, त्या चेतनेतील आवरणांनुसार, एक विशिष्ट क्षेत्र तयार करते. चेतनेच्या एका क्षेत्रातून वाहणारी ऊर्जा द्वेषाच्या रूपात प्रकट होते, तर चेतनेच्या दुसऱ्या क्षेत्रातून वाहणारी ऊर्जा प्रेमाच्या रूपात प्रकट होते. या दोन्हीच्या दरम्यान, ज्याप्रमाणे अव-आण्विक कणांचे अनेक प्रकार आहेत, त्याप्रमाणेच अनेक संभाव्य गुण आपल्याला आढळू शकतात. उदाहरणार्थ, एखादी विशिष्ट चेतना दयाळू, करुणामयी आणि समानुभूतीपूर्ण असेल, दुसरी लोभी व स्वार्थी असेल आणि दुसरी एखादी उदासीन असेल.

हे फरक व्यक्तींमध्ये दिसू शकतात, त्याचप्रमाणे ते एकाच व्यक्तीमध्ये वेगवेगळ्या वेळीही दिसू शकतात. उदाहरणार्थ, समजा, एखाद्या व्यक्तीवर तुमचे खूप प्रेम आहे, परंतु नंतर एखादी अशी परिस्थिती उद्भवते की ज्यामुळे तुमची ती भावना बदलते. दुसऱ्या व्यक्तीबद्दलची तुमची बदललेली धारणा ऊर्जेचा प्रवाह बदलते. परिणामी, तुमच्या स्वतःच्या चक्रांवर परिणाम होतो, आणि तुमची बदललेली धारणा परिस्थितीचा पुन्हा पुन्हा विचार केल्यामुळे बळकट होते. चेतनेचा हा बदलणारा पट हे तेच ऊर्जाक्षेत्र आहे, ज्याबद्दल आपण बोलत आहोत.

*मनातून प्रवाहित होणारी ऊर्जा, त्या व्यक्तीच्या चेतनेद्वारे, त्या चेतनेतील आवरणांनुसार, एक विशिष्ट क्षेत्र तयार करते. चेतनेच्या एका क्षेत्रातून वाहणारी ऊर्जा द्वेषाच्या रूपात प्रकट होते, तर चेतनेच्या दुसऱ्या क्षेत्रातून वाहणारी ऊर्जा प्रेमाच्या रूपात प्रकट होते.*

जेव्हा आपण संवाद साधतो तेव्हा त्यात जटीलतेची आणखीच भर घातली जाते, कारण आपण एकमेकांना खूप फसवत असतो. तुम्ही कदाचित एखाद्याचा द्वेष करत असता आणि त्यांना फसवू इच्छिता - हा तुमचा आंतरिक हेतू असतो - परंतु तुम्ही वरवर हसत असता. तुमच्या आतील ऊर्जेच्या क्षेत्रात आणि बाहेरील क्षेत्रात सुसंगतता राहत नाही. तुमचे दृश्य स्वरूप फसवे आहे, त्यामुळे तुमचे ऊर्जाक्षेत्र बिघडलेले आहे. तुमचे मन आणि मेंदू यांच्यातील विसंगतीमुळे गुंतागुंत निर्माण होते. मग भावना तुमच्या हृदयात जटीलता निर्माण करतात. आणि जटीलता या चेतन आणि अवचेतन मनातसुद्धा असू शकतात, कारण बऱ्याचदा आपण अवचेतनेविषयी अनभिज्ञ असतो.

म्हणून, आपल्या हेतूकडे लक्ष द्या. हेतू तुमची विचारसरणी बदलू शकतो. आणि जर तुमची ती संधी हुकली आणि तुमच्या संस्कारांच्या घडणीनुसार विचार बनले, तरीही काही कृती करण्यापूर्वी तुमच्या विचारांची पद्धत बदलण्याची क्षमता तुमच्याकडे असते. ऋषी आणि संत प्रतिबंधाचा अवलंब करतात - ते त्यांच्या हेतूंमध्ये सुधारणा करतात. सुज्ञ लोक त्यांच्या विचारांमध्ये सुधारणा करतात. व्यवहारी माणसे त्यांच्या कृतींमध्ये सुधारणा करतात. शुद्धीकरण सर्व टप्प्यांवर हस्तक्षेप शक्य बनवू शकते.

या क्रमवारीत गुरुदेवांची भूमिका काय आहे? जर आपण अनुमती दिली तर गुरुदेव आपल्या चेतनेला प्रभावित करतात. जर आपण त्यांच्याशी अनुनादित झालो तर आपण त्यांची चेतना उसनी घेतो, जेणेकरून आपण आपल्या मर्यादित दृष्टीतून नाही तर त्यांच्या दृष्टीतून पाहू शकू. हे एखाद्या लहान मुलाने त्याच्या पित्याच्या नजरेतून जग पाहण्यासारखे आहे - वडिलांच्या खांद्यावर बसलेले मूल वडिलांना दिसणारे जग पाहू शकते. कदाचित तो त्या क्षणी त्याच्या वडिलांसारखा बनणार नाही, पण तो त्यांना दिसणारे जग पाहण्यासाठी स्वतःला उचलून घ्यायला वडिलांना सांगू शकतो. तसेच गुरुदेव आपल्याला उचलून घेतात.

अशा प्रकारे, सतत स्मरणाचे विविध पैलू आहेत. ध्यानापासून आणि ती स्थिती टिकवण्यापासून त्याची सुरुवात होते. मग "मी माझ्या गुरुदेवांसाठी सर्व काही करत आहे" हा विचार समाविष्ट करण्यात त्याचा विस्तार होतो. मग अशी अवस्था येते की काम करीत असताना आपण त्यांच्यामध्ये लीन होतो. अशा वेळी आपण वेगवेगळे निकष लावत असतो.

गुरुदेवांचा प्रभाव पडण्यासाठी, आपल्याला अशा स्थितीस पोहोचले पाहिजे, जिथे आपण आपली वागण्याची जुनी पद्धत अजिबात सहन करू शकत नाही. गुरुदेव आपणा सर्वांवर एकसारखे काम करतात, परंतु परिणाम मात्र वेगवेगळे असतात. ते प्रत्येकामध्ये अशी अवस्था निर्माण करू शकत नाहीत. असे का होते? कारण यश हे गुरुदेवांच्या नाही तर अभ्यासीच्या हातात असते. म्हणून आपण साधना करतो आणि म्हणूनच आपल्याला जीवित गुरूची आवश्यकता असते. अशा मृत व्यक्तीला आपण कसे शरण जाणार, जो आपल्याशी भांडू शकत नाही, आपल्याला चीड आणू शकत नाही आणि आपल्याला परिवर्तन करण्याचे आव्हान देऊ शकत नाही?

प्रेम आणि आदरपूर्वक

*कमलेश*

कान्हा शांती वनम येथे 19 ऑगस्ट 2022 रोजी
जन्माष्टमीनिमित्त दिलेला संदेश

heartfulness
advancing in love